# वि.दि.दा.क्र. ०६/२०१७
# CNRNOMHOS120001742017
# अनिल वि. शासन व इतर
# नि.क्र. १०४ खालील आदेश
# (आदेश दि.०१/०४/२०२५)

१. प्रस्तुत अर्ज हा वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशीक ६ नियम १७ अन्वये मुळ दाव्यामध्ये (निशाणी १ मध्ये) दुरुस्तीसाठी दाखल केला आहे. अर्जातील कथनाप्रमाणे प्रस्तुतचा दावा दाखल झाल्यानंतर दाव्यातील प्रतिवादी क्र.३ याने टी.पी. वर्धमान सुर्या लिमीटेड या कंपनीच्या हक्कात गाव मिळकतीबाबत लीज डीड क्र. ९९/२०२४, १००/२०२४ व १०१/२०२४ दिनांक १२.०१.२०२४ रोजी करुन दिले आहेत. प्रतिवादी क्र.३ व सदर कंपनीला प्रस्तुतचा दावा प्रलंबीत असल्याची कल्पना असुन देखील त्यांनी वादीला दावा मिळकतीतील त्याच्या हक्कापासून वंचीत ठेवण्यासाठी जाणुन-बुजुन सदरच्या लीज डीड केलेल्या आहेत. सदरच्या लीज डीडला प्रलंबीत दाव्याच्या सिद्धांताची बाधा येते व त्यामुळे प्रतिवादी क्र.८ याने लीज डीडमध्ये नमूद मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये अथवा लीज डीडमधील मिळकतींवर कोणतेही कर्ज काढु नये याबाबत प्रस्तावित प्रतिवादी क्र.८ यांच्याविरुध्द मनाई हुकूम होणे गरजेचे आहे. त्यामुळे वादीला सदरप्रमाणे लीज डीड बाबतची कथने परिच्छेद क्र.१०/अ नंतर नवीन परिच्छेद क्र. १०/ब असा समाविष्ट करुन दाव्यात करण्याची आहेत. त्याचप्रमाणे वादीला सदर टी.पी. वर्धमान सुर्या लि. कंपनी यांच्यातर्फे मॅनेंजर यांना प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ८ म्हणुन समाविष्ट करायचे आहे. त्याचप्रमाणे वादीला दाव्याच्या मागणी परिच्छेदमध्ये सदरच्या लीज डीड व्यर्थ व निरर्थक आहेत अशी दाद मागायची आहे अथवा वैकल्पीकरित्या वादीला प्रतिवादीकडून टॅरीफची रक्कम वसुल होवून मिळण्यासाठी दाद मागायची आहे.

२. संधी देवून देखील प्रतिवादी याने प्रस्तुत अर्जाला म्हणणे दाखल केले नाही.

३. पुकारा केले असता दोन्ही पक्षकार युक्तीवादासाठी गैरहजर.

४. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले. वादी दाव्यामधील दुरुस्तीद्वारे जी काही कथने समाविष्ट करु ईच्छीत आहे ती कथने दावा दाखल झाल्यानंतर घडलेल्या घडांमोडीबाबतीत असल्यामुळे त्याबाबतची दुरुस्ती मंजुर केली जावू शकते. वादीने दावा हा वाटपाचा केलेला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र.३ याने प्रस्तुत दावा प्रलंबीत असताना प्रस्ताविती प्रतिवादी क्र. ८ या कंपनीला लीज डीड करुन दिलेले आहेत व प्रस्तुत प्रलंबीत दाव्याची कल्पना प्रतिवादी क्र.३ व प्रस्तावित प्रतिवादी क्र. ८ यांना असून देखील

त्यांनी सदरच्या लीज डीड केलेल्या आहेत. त्यामुळे या कारणास्तव वादीला सदर लीज डीडबाबतची कथने दाव्यामध्ये दुरुस्तीद्वारे मागता येतात व त्या अनुषंगाने वादीला सदर लीज डीडबाबत दाव्याच्या विनंती कलमामध्ये दाद देखील मागता येते. दावा प्रलंबीत असताना घडलेल्या घडांमोडीबाबत वादीने दुरुस्ती मागीतली असल्यामुळे सदर दुरुस्ती मंजुर केल्यास दाव्याच्या मुलभुत स्वरुपात कोणताही बदल होत नाही. त्याचप्रमाणे, प्रस्तावित प्रतिवादी क्र.८ या कंपनीच्या लाभार्थ लीज डीड करुन दिले असल्यामुळे व वादीच्या कथनांनुसार सदर प्रस्तावित प्रतिवादी क्र.८ या कंपनीला प्रस्तुत दावा प्रलंबीत असल्याबाबतीत कल्पना असुन देखील त्या कंपनीने लीज डीड केल्यामुळे त्या कंपनीला सदर दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणुन समाविष्ट करुन घेणे गरजेचे ठरते. त्यामुळे दुरुस्ती अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, खालील आदेश.

## आदेश

१. निशाणी क्र.१०४ खालील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तुत आदेशाच्या अनुषंगाने वादीने योग्य ती दुरुस्ती निशाणी क्रमांक १ मध्ये आजपासून १४ दिवसांच्या आत करण्याचे आहे.

३. प्रस्तुत अर्जाचा खर्च हा प्रस्तुत वादीने सोसाण्याचा आहे.

AMOGH PRABHAKAR KULKARNI
Digitally signed by AMOGH PRABHAKAR KULKARNI
Date: 2025.04.01 15:16:21 +0530

(ए. पी. कुलकर्णी )

दिनांक – ०१/०४/२०२५

सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
भूम.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Mr. Sayyad R.M.,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Mr. A. P. Kulkarni<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom, District - Osmanabad. |
| Date | --- | 01/04/2025 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 01/04/2025 |
| Order uploaded on | --- | 01/04/2025 |